# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ,पुणे

## तृतीय वर्ष कला

## प्रात्यक्षिक भूगोल

# वृत्तजाळी संदर्भ पध्दती

डॉ.संदीप कदम

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय,श्रीगोंदा

वर्ग –टी.वाय .बी.ए.

**Practical Geography Gg – 301 Techniques of Spatial Analysis (S4)**

**Types of SOI Maps**

# वृत्तजाळी संदर्भ

- प्रास्ताविक
  - नकाशातील वृत्तजाळी संदर्भ पध्दती पहिल्या महायुध्दाच्या काळात अस्तित्वात आली. दिलेल्या मुळ स्थानापासून नकाशात दाखविलेले एखादे स्थान कोणत्या दिशेस व किती अंतरावर आहे हे ठरविण्यासाठी या वृत्तजाळी संदर्भ पध्दतीचा उपयोग केला जातो. वृत्तजाळी संदर्भ असलेल्या नकाशांचा उपयोग प्रामुख्याने युध्द काळात केला जातो.
  - अशा वृत्तजाळी संदर्भ नकाशामध्ये तपकिरी व लाल रंगाच्या अनेक उभ्या व आडव्या रेषा काढून जाळी तयार झालेली असते. जाळीतील लहान चौकोनाची बाजू १ किमी अंतर दर्शविते तर अशा लहान १०० चौकोनांना इंग्रजीतील आय हे अक्षर ओोळखून ए ते झेड पासूनची अक्षरे लिहलेली असतात. व त्या प्रत्येक चौकोनाची प्रत्येक बाजू १० किमी इतके अंतर दर्शविते. व अशा प्रकारे वृत्तजाळी संदर्भ तयार होतो.

# वृत्तजाळी संदर्भ

- ईस्टिंग्ज

वृत्तजाळी संदर्भ नकाशामध्ये वृत्तजाळीमध्ये नैऋत्य दिशेपासून पूर्वेकडे जे अंतर मोजले जाते त्यास 'ईस्टिंग्ज' असे म्हणतात. दोन अंकी वृत्तजाळी संदर्भामध्ये ईस्टिंग्ज १ किमी या फरकाने असतात. चार अंकी वृत्तजाळी संदर्भामध्ये १०० मीटर च्या फरकाने तर सहा अंकी जाळी संदर्भामध्ये १० मीटरच्या फरकाने लिहलेले असतात.



# वृत्तजाळी संदर्भ

- नॉर्दिंग्ज




❖ वृत्तजाळी संदर्भ नकाशामध्ये वृत्तजाळीमध्ये नैऋत्य दिशेपासून उत्तरेकडे जे अंतर मोजले जाते त्यास ‘नॉर्दिंग्ज’ असे म्हणतात. दोन अंकी वृत्तजाळी संदर्भामध्ये ईस्टिंग्ज प्रमाणेच नॉर्दिंग्ज १ किमी (१००० मीटर) या फरकाने असतात. चार अंकी वृत्तजाळी संदर्भामध्ये १०० मीटर च्या फरकाने तर सहा अंकी जाळी संदर्भामध्ये १० मीटरच्या फरकाने लिहलेले असतात.


# वृत्तजाळी संदर्भ

– वृत्तजाळी संदर्भ लिहताना प्रथम ईस्टिंग्ज लिहीतात. आणि नंतर नॉर्दिंग्ज लिहीतात.

– उदा 2030 (E20 N30)



# वृत्तजाळी संदर्भ




19 43

# वृत्तजाळी संदर्भ

- दोन अंकी वृत्तजाळी संदर्भ
  - ❖ इंग्रजीतील आय हे अक्षर वगळून ए पासून झेड पर्यंतचा कोणताही एक क्रमांकाचा नकाशा विचारात घेऊन नैऋत्य बिंदूपासून पूर्वेस आणि उत्तरेस अंतर मोजून नकाशाचा क्रमांक व दोन अंकी वृत्तजाळी संदर्भ लिहीला जातो. म्हणून त्यास दोन अंकी वृत्तजाळी संदर्भ असे म्हणतात.

- E25N37

# वृत्तजाळी संदर्भ

- चार अंकी वृत्तजाळी संदर्भ
  - ❖ दोन अंकी वृत्तजाळी संदर्भासाठी निश्चित केलेल्या नकाशाचे उभे आडवे प्रत्येकी १० भाग पाडून १०० चौकोन तयार केले जातात व अंतर शेकडा व मीटर मध्ये लिहीली जातात. व नकाशाचा क्रमांक आणि पूर्वेकडील अंतर व उत्तरेकडील अंतर ४ अंकामध्ये लिहीले जाते. म्हणून त्यास चार अंकी वृत्तजाळी संदर्भ असे म्हणतात.


E2522N3735

# वृत्तजाळी संदर्भ

- सहा अंकी वृत्तजाळी संदर्भ
  - ❖ चार अंकी वृत्तजाळी संदर्भासाठी विचारात घेतलेला नकाशाचे उभे आडवे प्रत्येकी १० भाग पाडून १०० चौकोन तयार केले जातात. या नकाशात नॉर्दिंग्ज व ईस्टिंग्ज १० मीटरच्या फरकाने लिहिलेले असते. या नकाशाचा वृत्तजाळी संदर्भ लिहिताना नकाशाचा क्रमांक आणि पूर्वेकडील अंतर व उत्तरेकडील अंतर सहा अंकामध्ये लिहीले जाते. म्हणून त्यास सहा अंकी वृत्तजाळी संदर्भ असे म्हणतात.

E252220N373522

# दोन अंकी वृत्तजाळी संदर्भ




Grid ref: 646 504